कार्यालयीन कामकाजाबाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/५२२३/ ७०४ /२०२४
अहमदनगर दिनांक १० / ०५ /२०२४

वाचा:- १. उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) जि.प.अहमदनगर यांचेकडील अहवाल जा.क्र.कार्या/जि.प./मग्रारोहयो कक्ष/१५८/२०२३ दि १८/१०/२०२३

२. या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि-१/५२२३/१४५४ दिनांक १३/१२/२०२३

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र जा.क्र. आस्था-१/१४६५/२०२३ दिनांक २९/१२/२०२३ समवेत श्री. घोडके यांचा खुलासा दिनांक २२/१२/२०२३

४. या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/ ५२२३/३१८/२०२४ दिनांक २१/०२/२०२४

५. श्री. गणेश दिलीप घोडके, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील खुलासा दिनांक ०७/०३/२०२४

६. श्री. रामकृष्ण जगताप, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा तथा कृषि अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील अहवाल दिनांक ०८/०४/२०२४

७. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२)

श्री. गणेश दिलीप घोडके, हे पंचायत समिती श्रीगोंदा, येथे वरिष्ठ सहाय्यक या पदावर कार्यरत असताना त्यांच्याकडे पंचायत समिती श्रीगोंदा अधिनस्त मग्रारोहयो कक्षाकडील कार्यभार सोपविणेत आलेला होता. त्यांनी मग्रारोहयो कक्षाकडील कामकाज करत असताना त्यांच्या कामकाजाबाबत तक्रार प्राप्त झालेने मग्रारोहयो कक्षाकडील संपुर्ण कार्यभाराची दप्तराची तपासणी करणेत आलेली आहे. सदर तपासणीमध्ये आढळुन आलेल्या अनियमितते बाबत श्री. घोडके यांना संदर्भ क्रमांक २ अन्वये १ ते ६ मुद्यांबाबत कारणे दाखवा नोटीस बजावणेत आलेली होती.

संदर्भ क्रमांक ३ अन्वये श्री घोडके यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचे मार्फत खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलाशाचे अवलोकन केले असता श्री. घोडके यांनी सादर केलेला खुलासा हा कारणे दाखवा नोटीशीमधील मुद्यानुसार संयुक्तीक नसलेने संदर्भ क्रमांक ४ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावणेत येऊन श्री. घोडके यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार, श्री. घोडके यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशारितीने दोन वर्षाकरीता थोपविणे ही शिक्षा का करणेत येऊ नये? या बाबत खुलासा सादर करणे बाबत श्री. घोडके यांनी कळविणेत आले.

..२

श्री. घोडके गणेश दिलीप, वरिष्ठ सहाय्यक, यांनी संदर्भ क्रमांक ५ नुसार खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलाश्यावरुन तसेच तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील अभिप्रायानुसार श्री. घोडके यांचा खुलासा अंशत: मान्य करणेत येऊन कारणे दाखवा नोटीशीमध्ये नमुद केलेल्या शिक्षेऐवजी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार, श्री. घोडके गणेश दिलीप, वरिष्ठ सहाय्यक यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशारितीने एक वर्षाकरीता थोपविणे ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री. घोडके गणेश दिलीप, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती श्रीगोंदा यांच्या मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202405170400048 असा आहे.

(आशिष येरेकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्री. घोडके गणेश दिलीप, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती श्रीगोंदा

प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा

२/- सदरचा आदेश श्री. घोडके गणेश दिलीप, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती श्रीगोंदा यांना बजावून दुस-या प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेवून या कार्यालयास सादर करावी व सदर आदेशाची नोंद संबधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत:- निवड नस्ती

(आशिष येरेकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर